राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२४ मधून निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावर शिफारस पात्र उमेदवारांना सरळसेवेने नियुक्ती व पदस्थापना देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन आदेश क्रमांक : ससेनि-१३२६/प्र.क्र.१२१/ना.पु.१५,**
**मंत्रालय , मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६.**

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्यासन-१२, दि. १४.०७.२०२१ (महसूल विभाग वाटप नियम, २०२१).
२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, अधिसूचना क्र. सेप्रनि-१२२०/प्र.क्र.१४०/ना.पु.-१५, दि. २७.०३.२०२३ (सेवाप्रवेश नियम, २०२३).
३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. १४७७/२/२०२४/२०, दि. २५.०५.२०२६.

**प्रस्तावना :-**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय पुरवठा यंत्रणेतील निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावरील सरळसेवा भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२४ मधून आयोगाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि. २५.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये ७५ उमेदवारांच्या शिफारशी या विभागास सादर केल्या आहेत. सदर उमेदवारांची मूळ कागदपत्र पडताळणी दि.१७.०६.२०२६ ते दि.१९.०६.२०२६ या कालावधीत पूर्ण करण्यात आली. शिफारस प्राप्त ७५ उमेदवारांपैकी श्री. सतीश भाऊसाहेब सरोदे (गु.क्र.१६) व श्रीम. सोनाली मोहन वनखंडे (गु.क्र. ६२) हे दोन उमेदवार सदर कागदपत्र पडताळणीसाठी अनुपस्थित राहिल्याने त्यांना निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

सबब, सदर दोन उमेदवारांना वगळून उर्वरित ७३ उमेदवारांच्या नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटपाबाबत विकल्प दि.२१.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आले. सदर उमेदवारांनी दिलेले महसुली विभागाची पसंती, नियम ७ अंतर्गत सूट अनुज्ञेय असणारी प्रकरणे, महसूल विभाग निहाय उपलब्ध रिक्त पदांची संख्या तसेच संबंधित उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक विचारात घेऊन, महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील नियम ६ व ७ मधील लागू तरतुदींनुसार संबंधित उमेदवारांना महसूल विभाग वाटप करण्यात आले आहे.

तद्नुसार, वाटप करण्यात आलेल्या महसुली विभागांतील रिक्त पदांचा विचार करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसप्राप्त व नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या ७३ उमेदवारांना निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावर नियुक्ती व पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि.२५.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पत्रान्वये राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२४ मधून निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या आणि नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या एकूण ७३ उमेदवारांना सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या नियुक्तीच्या प्रवर्गात व पदस्थापनेच्या कार्यालयात, सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-१४ (रु. ३८,६००-१,२२,८००) मध्ये, ते प्रत्यक्ष ज्या दिवशी रुजू होतील त्या दिनांकापासून, खालील विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सरळसेवेने नियुक्ती व पदस्थापना देण्यात येत आहे.

२. उपरोक्त उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४.०७.२०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदी लागू राहतील.

३. सदर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती दि.२७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम ९ नुसार दोन वर्षांचा परिवीक्षाधीन कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याच्या व खालील अटी व शर्तींच्या अधीन राहील.

१. सदर उमेदवारांची नियुक्ती ही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दि.२७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम ७(ख) व ८ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीवरून नामनिर्देशनाने, सरळसेवा कोट्यातील मंजूर रिक्त पदावर करण्यात येत आहे.

२ . सदर उमेदवारांना परिशिष्ट-अ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या महसूल विभागात व कार्यालयात नियुक्ती व पदस्थापना देण्यात येत आहे. सदर पदस्थापना महसूल विभाग वाटप नियम, २०२१ व प्रचलित सेवाविषयक नियमांच्या अधीन राहील. संबंधित उमेदवारास कोणत्याही विशिष्ट कार्यालयात कायमस्वरूपी पदस्थापना मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

३ . सदर उमेदवारांनी नियुक्ती देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील. विहित मुदतीत रुजू होणे शक्य नसल्यास अपरिहार्य व उचित कारणास्तव उमेदवाराने शासनाकडून मुदतवाढ घेणे आवश्यक राहील.

त्याचप्रमाणे कोणत्याही अपरिहार्य कारणांशिवाय विहित मुदतीत रुजू न होणाऱ्या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील व त्यांचा नियुक्तीकरिता कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही. यासाठी त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही.

४.	एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य व उचित कारणास्तव रुजू होण्यासाठी मुदतवाढ आवश्यक असल्यास, संबंधित उमेदवाराने या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सकारण लेखी अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच उचित कारणास्तव विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा/नाकारण्याचा अंतिम निर्णय शासनाचा राहील.

५.	सदर उमेदवारांची निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, २०२१ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांच्या अधीन राहून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल.

नियुक्तीच्या विहित मुदतीत रूजू न होणे अथवा मुदतवाढ प्राप्त होणे यामुळे सेवाज्येष्ठतेवर होणारे परिणाम संबंधित नियमांनुसार निश्चित करण्यात येतील.

६.	मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांची नियुक्ती ही त्यांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या अनुकूल पडताळणी अहवालाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संबंधित उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती करण्यात आलेल्या कार्यालयास सदर करणे आवश्यक राहील. त्यानुसार संबंधित उमेदवारांच्या मूळ सेवापुस्तकात नोंद घेण्याची कार्यवाही संबधित कार्यालय प्रमुखांनी करावी.

तसेच मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर नियुक्त करण्यात आलेल्या ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारांच्या सेवा प्रचलित नियमानुसार समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

७.	विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना लागू असलेल्या नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्राच्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांच्या संबंधित प्रमाणपत्रांच्या सत्यता व ग्राह्यतेच्या पडताळणीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

८.	अनाथ, खेळाडू, दिव्यांग किंवा अन्य लागू समांतर / विशेष आरक्षणातून नियुक्त शिफारस प्राप्त उमेदवारांना त्यांच्या अर्हता प्रमाणपत्रांच्या अनुकूल पडताळणी अहवालाच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

९. सदर उमेदवारांनी दि. २७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम १०(२) नुसार मराठी भाषा परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केलेली नसल्यास अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून नियमानुसार सूट प्राप्त नसल्यास, नियुक्तीनंतर विहित मुदतीत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा नियमानुसार सूट प्राप्त होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ व पुढील पदोन्नतीबाबत सेवाप्रवेश नियमांतील निर्बंध लागू राहतील.

१०. सदर उमेदवारांनी दि.२७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम ११(२) नुसार शासनाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहित मुदतीत धारण करणे आवश्यक राहील. तथापि, संबंधित उमेदवारास शासनाच्या प्रचलित नियमांनुसार संगणक अर्हता धारण करण्यापासून सूट अनुज्ञेय असल्यास ती लागू राहील.

संगणक अर्हता प्राप्त न केल्यास अथवा नियमानुसार सूट नसल्यास वार्षिक वेतनवाढ व पुढील पदोन्नतीबाबत सेवाप्रवेश नियमांतील निर्बंध लागू राहतील. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उमेदवारांच्या संगणक अर्हता प्रमाणपत्राची किंवा अनुज्ञेय सूट आदेशाची नोंद सेवापुस्तकात घ्यावी.

११. सदर नियुक्ती उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता, प्रवर्ग, आरक्षण व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यतेच्या अधीन राहील. नियुक्तीनंतर कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे, बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे अथवा विहित अर्हता धारण केली नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवाराबाबत प्रचलित कायदे, शासन निर्णय व विहित प्रक्रियेच्या अधीन राहून सेवा समाप्ती, फौजदारी अथवा अन्य आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१२. उमेदवाराने साक्षांकन नमुन्यात अथवा प्रतिज्ञापनात सादर केलेली माहिती असत्य असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित उमेदवाराबाबत प्रचलित कायदे, शासन निर्णय व विहित प्रक्रियेच्या अधीन राहून सेवा समाप्ती, फौजदारी अथवा अन्य आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१३. सदर उमेदवारांपैकी एखादा उमेदवार केंद्र शासन, राज्य शासन, निमशासकीय संस्था किंवा अन्य कार्यालयात कार्यरत असल्यास, संबंधित उमेदवाराने पूर्वीच्या कार्यालयातून नियमानुसार कार्यमुक्त झाल्याचा आदेश किंवा आवश्यक राजीनामा स्वीकृती आदेश नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू होताना सादर करणे आवश्यक राहील. असा आदेश सादर न केल्यास संबंधित उमेदवारास रूजू करून घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीपूर्वी शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू अथवा प्रस्तावित नाही या बाबीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

१४. सदर उमेदवार प्रत्यक्ष ज्या दिनांकास रूजू होतील त्या दिनांकापासून त्यांचे गोपनीय अहवाल / वार्षिक कामगिरी मूल्यांकन अहवाल प्रचलित नियम व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी लिहावेत.

१५. सदर उमेदवारांपैकी दि.०१.११.२००५ पूर्वी शासनाच्या निवृत्तीवेतनपात्र आस्थापनेवर कार्यरत असलेल्या उमेदवारांना वित्त विभागाच्या दि.१२.०१.२००७ व दि. १८.०८.२००९ रोजीच्या शासन परिपत्रकांतील विहित अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील.

तसेच, प्रथमच शासनसेवेत प्रवेश करणाऱ्या अथवा जुनी निवृत्तीवेतन योजना लागू होण्यासाठीच्या अटींची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांना वित्त विभागाच्या दि.३१.१०.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू राहील.

याशिवाय,पात्र उमेदवारांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना किंवा केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) यांपैकी अनुज्ञेय योजनेचा विकल्प, वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांतील तरतुदी व विहित मुदतीच्या अधीन राहून उपलब्ध राहील. तरी, संबंधित उमेदवारांच्या पूर्वसेवेची व निवृत्तीवेतनपात्रतेची पडताळणी करून त्यांच्या विकल्पानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

१६. सदर उमेदवारांना शासन सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेच्या राजीनामा द्यावयाचा असल्यास, उमेदवारास सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०२.१२.१९९७ च्या शासन निर्णयातील लागू तरतुदींनुसार एक महिन्याची आगाऊ लेखी सूचना अथवा त्या कालावधीचे वेतन, जसे नियमानुसार लागू असेल, देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्वीकारण्याचे अधिकार केवळ नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे राहतील. संबंधित क्षेत्रिय कार्यालयाने परस्पर राजीनामा स्वीकारू अथवा मंजूर करू नये.

१७. सदर उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी अहवाल संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत. सदर प्रमाणपत्रे संबंधित विभागीय कार्यालयात उमेदवारांच्या सेवा पुस्तकात नोंदी घेण्यास्तव मागाहून पाठविण्यात येतील.

१८. सदर उमेदवारांना दि.२७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम ९ नुसार दोन वर्षांचा परिवीक्षाधीन कालावधी लागू राहील. सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार सदर परिवीक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एका वर्षाने वाढविता येईल. संबंधित उमेदवाराने परिवीक्षा कालावधी, वाढीव कालावधीसह, शासनाच्या परिवीक्षा धोरणानुसार समाधानकारकरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

तसेच सेवाप्रवेश नियमात नमूद केल्यानुसार, शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार (वाढीव कालावधीसह) परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या किंवा परिवीक्षा कालावधीतील कोणतीही असल्यास, विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा कोणतेही असल्यास, विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण नसेल तर ती तिची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

तरी, परिवीक्षा कालावधीत उमेदवाराचे कामकाज, वर्तणूक, कार्यक्षमता अथवा सेवाप्रवेश नियमांतील अनिवार्य अटींची पूर्तता समाधानकारक नसल्यास संबंधितत उमेदवाराची सेवा प्रचलित नियम व परिवीक्षा धोरणानुसार समाप्त करण्यासही पुढील कार्यवाही करता येईल.

१९. सदर उमेदवारांना परिवीक्षाधीन कालावधीतील रजेसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२.०६.२०२१ रोजीच्या परिवीक्षा धोरणातील तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियमांतील लागू तरतुदी लागू राहतील.

२०. सदर उमेदवारांपैकी पूर्वीपासून शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांची निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावरील वेतननिश्चिती वित्त विभागाच्या दि.२३.०३.१९९४ रोजीच्या शासन निर्णयातील लागू तरतुदी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार करण्यात यावी.

प्रथमच शासनसेवेत प्रवेश करणाऱ्या उमेदवारांची वेतननिश्चिती प्रचलित महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमांनुसार करण्यात यावी.

२१. सदर उमेदवारांना दि.२७.०३.२०२३ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम १३ नुसार महाराष्ट्र राज्यात कुठेही बदलीसाठी पात्र राहावे लागेल. तथापि, अशी बदली महसूल विभाग वाटप नियम, २०२१ व प्रचलित बदलीविषयक धोरणातील तरतुदींनुसार करण्यात येईल.

२२. सदर उमेदवारांना प्रथम नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता प्रचलित नियमांनुसार अनुज्ञेय राहणार नाही.

**४.** तरी, सर्व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी सदर शिफारस प्राप्त निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) उमेदवारांना त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू करून घ्यावे व सदर उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी रूजू करून घेतल्यानंतर त्यांचा प्रत्यक्ष रूजू दिनांक, रूजू अहवालाची प्रत शासनास दि.२७.१०.२०२६ पर्यंत सादर करावी.

५. नियुक्ती देण्यात येत असलेल्या उमेदवारांनी नियुक्तीच्या / पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न होता, विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/नियुक्ती मिळविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधी/खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचेमार्फत दडपण/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित उमेदवारांबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील लागू आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९२४१८०९४३१७०६ असा आहे. हा शासन आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:11:18 +05'30'

(प्रमोद पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

सर्व संबंधित शिफारस प्राप्त उमेदवार (ई-मेल द्वारे)

**प्रत :-**

१. मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
५. महालेखापाल ½, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल ½, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि., मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (ना.पु.१५)

## शासन आदेश क्रमांक : ससेनि-१३२६/प्र.क्र.१२१/ना.पु.१५, दि.२४.०९.२०२६

### परिशिष्ट-अ

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ द्वारे शिफारस प्राप्त उमेदवारांना निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या पदावर नियुक्ती व पदस्थापना

| अ.क्र. | मूळ गु.क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे कार्यालय / ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ASBE OMKAR LAXMAN<br>आसबे ओंकार लक्ष्मण | SEBC | OPEN – General - १ | पुणे | तहसिल कार्यालय, माळशिरस, जि.सोलापूर |
| २ | २ | KHENGARE NITIN BHOLAJI<br>खेंगरे नितीन भोलाजी | SEBC | OPEN – General - २ | पुणे | अ परिमंडळ, अन्नधान्य वितरण कार्यालय,सोलापूर, जि.सोलापूर |
| ३ | ३ | Surve Shubham Kumar<br>सुर्वे शुभम कुमार | SEBC | OPEN – General - ३ | पुणे | तहसिल कार्यालय, भोर, जि.पुणे |
| ४ | ४ | MAGAR VAIBHAV BALASAHEB<br>मगर वैभव बाळासाहेब | SEBC | OPEN – General - ४ | पुणे | ड परिमंडळ,अन्नधान्य वितरण कार्यालय, सोलापूर, जि.सोलापूर |
| ५ | ५ | GAURKAR NILESH MADHUKAR<br>गौरकार निलेश मधुकर | OBC | OPEN – General - ५ | कोकण -२ | तहसिल कार्यालय, पोलादपूर, जि.रायगड |
| ६ | ६ | MANDAVE AKASH ASHOK<br>मांडवे आकाश अशोक | SEBC | OPEN – General - ६ | पुणे | तहसिल कार्यालय, आटपाडी, जि.सांगली |
| ७ | ७ | NIMBALKAR SURENDRA ASHOK<br>निंबाळकर सुरेंद्र अशोक | SEBC | OPEN – General - ७ | पुणे | तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर |
| ८ | ८ | SWAMI PANKAJ VIRBHADRA<br>स्वामी पंकज विरभद्र | Unreserved | OPEN – General - ८ | नागपूर | तहसिल कार्यालय, तिरोडा, जि.गोंदिया |
| ९ | ९ | Deshmukh Nitin Dilip<br>देशमुख नितीन दिलीप | SEBC | OPEN – General - ९ | पुणे | तहसिल कार्यालय, करमाळा, जि.सोलापूर |
| १० | १० | MANOJ KRISHNRAO YADAV<br>मनोज कृष्णराव यादव | OBC | OBC – General - १ | पुणे | तहसिल कार्यालय, आजरा, जि.कोल्हापूर |
| ११ | ११ | Waghmare Tushar Annasaheb<br>वाघमारे तुषार आण्णासाहेब | OBC | OPEN – General - १० | पुणे | तहसिल कार्यालय, चंदगड, जि.कोल्हापूर |
| १२ | १२ | JAGTAP PRADIP DATTATRAY<br>जगताप प्रदिप दत्तात्रय | OBC | OPEN – General - ११ | नागपूर | अ परिमंडळ, धंतोली झोन, जि.नागपूर |
| १३ | १३ | RAJE LAHURAJ VASANT<br>राजे लहुराज वसंत | OBC | OPEN – General - १२ | पुणे | तहसिल कार्यालय, पलूस, जि.सांगली |
| १४ | १४ | Chavan Navnath Dattu<br>चव्हाण नवनाथ दत्तू | SEBC | SEBC – General - १ | पुणे | तहसिल कार्यालय, मंगळवेढा, जि.सोलापूर |

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C52100255E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:11:54 +05'30'

| अ.क्र. | मूळ गु.क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे कार्यालय / ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १५ | GUNJKAR ADINATH SHAMRAO<br>गुंजकर आदिनाथ शामराव | OBC | OBC – General – २ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, पाटोदा, जि.बीड |
| १६ | १७ | SHINDE SHIVAJI SIDRAYA<br>शिंदे शिवाजी सिद्राया | SEBC | SEBC – General – २ | पुणे | तहसिल कार्यालय, शाहूवाडी, जि.कोल्हापूर |
| १७ | १८ | NARUTE DEVIDAS SHIVAJI<br>नरुटे देविदास शिवाजी | NT-C | NT-C – General – २ | पुणे | तहसिल कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर |
| १८ | १९ | SANGLE SWAPNIL BHAGWAN<br>सांगळे स्वप्नील भगवान | NT-D | NT-D – General – १ | नाशिक | तहसिल कार्यालय, नवापूर, जि.नंदुरबार |
| १९ | २० | ABASAHEB BALCHAND MANAL<br>आबासाहेब बालचंद मनाळ | SEBC | SEBC – General – ३ | पुणे | तहसिल कार्यालय, कोरेगाव, जि.सातारा |
| २० | २१ | CHAVAN ABHISHEK VITTHAL<br>चव्हाण अभिषेक विठ्ठल | SEBC | SEBC – General – ४ | पुणे | तहसिल कार्यालय, कवठेमहांकाळ, जि.सांगली |
| २१ | २२ | BHARADE AJIT BHIKAJI<br>भराडे अजित भिकाजी | OBC | OBC – General – ३ | पुणे | तहसिल कार्यालय, भुदरगड, जि.कोल्हापूर |
| २२ | २३ | PAWAR KETAN BALWANT<br>पवार केतन बळवंत | OBC | OBC – General – ४ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, विक्रमगड, जि.पालघर |
| २३ | २४ | WAMAN ADESH ASHOK<br>वामन आदेश अशोक | OBC | OBC – General – ५ | नाशिक | तहसिल कार्यालय, जामखेड, जि.अहिल्यानगर |
| २४ | २५ | PATIL ABHISHEK RAJENDRA<br>पाटील अभिषेक राजेंद्र | OBC | OBC – General – ६ | कोकण -२ | तहसिल कार्यालय, तळा, जि.रायगड |
| २५ | २६ | GHANGALE AMOL SANJAY<br>घंगाळे अमोल संजय | OBC | OBC – General – ७ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, डहाणू, जि.पालघर |
| २६ | २७ | KHAMKAR VINAYAK PRAKASH<br>खामकर विनायक प्रकाश | SBC | SBC – General – १ | पुणे | तहसिल कार्यालय, शिराळा,जि.सांगली |
| २७ | २८ | KULKARNI PRANALI PRASHANT<br>कुलकर्णी प्रणाली प्रशांत | Unreserved Female | OPEN – Female – १ | पुणे | तहसिल कार्यालय, हातकणंगले, जि.कोल्हापूर |
| २८ | २९ | SHUBHADA CHARAPALE<br>शुभदा चरापले | Unreserved Female | OPEN – Female – २ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, कणकवली, जि.सिंधुदुर्ग |
| २९ | ३० | CHAVAN PRATIKSHA BABASAHEB<br>चव्हाण प्रतिक्षा बाबासाहेब | SEBC Female | OPEN – Female – ३ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, धाराशिव, जि.धाराशिव |

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C5210025S5E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:12:09 +05'30'

| अ.क्र. | मूळ गु.क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे कार्यालय / ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ३१ | SHETE SONALI JAYSING<br>शेटे सोनाली जयसिंग | SEBC Female | OPEN - Female - ४ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर |
| ३१ | ३२ | PATIL SNEHAL RAJENDRA<br>पाटील स्नेहल राजेंद्र | SEBC Female | OPEN - Female - ५ | नागपूर | तहसिल कार्यालय, अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया |
| ३२ | ३३ | Rasika Nitinkumar Shaha<br>रसिका नितीनकुमार शहा | Unreserved Female | OPEN - Female - ६ | कोकण -२ | तहसिल कार्यालय, सुधागड, जि.रायगड |
| ३३ | ३४ | KALE RUTUJA MADHUKAR<br>काळे ऋतुजा मधुकर | SEBC Female | SEBC - Female - १ | कोकण -२ | तहसिल कार्यालय, म्हसळा,जि.रायगड |
| ३४ | ३५ | KRUSHNA SUNIL RATHOD<br>कृष्णा सुनिल राठोड | DT-A | DT-A - General - १ | नाशिक | तहसिल कार्यालय, भडगाव, जि.जळगाव |
| ३५ | ३६ | VAISHNAVI GARJE<br>वैष्णवी गर्जे | NT-D Female | NT-D - Female - १ | नाशिक | तहसिल कार्यालय, शेवगाव,जि.अहिल्यानगर |
| ३६ | ३७ | JADHAV RANI MAROTRAO<br>जाधव राणी मारोतराव | SEBC Female | SEBC - Female - २ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, जालना,जि.जालना |
| ३७ | ३८ | Dipali Fakirchand Pawar<br>दिपाली फकिरचंद पवार | NT-C Female | NT-C - Female - १ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना |
| ३८ | ३९ | KADAM ANKITA BALASAHEB<br>कदम अंकिता बाळासाहेब | SEBC Female | SEBC - Female - ३ | अमरावती | तहसिल कार्यालय, धामणगाव रेल्वे, जि.अमरावती |
| ३९ | ४० | BALDI DINESH GOVINDLALJI<br>बालदी दिनेश गोविंदलालजी | EWS | EWS - General - १ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, जिंतूर. जि.परभणी |
| ४० | ४१ | WAGH DHANSHRI NARAYAN<br>वाघ धनश्री नारायण | OBC Female | OBC - Female - १ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग |
| ४१ | ४२ | PANMAND JYOTI SAMBHAJI<br>पानमंद ज्योती संभाजी | OBC Female | OBC - Female - २ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, शिरूर अनंतपाळ, जि.लातूर |
| ४२ | ४३ | WAGHMARE ASHLESHA NAMDEV<br>वाघमारे अश्लेषा नामदेव | OBC Female | OBC - Female - ३ | नाशिक | तहसिल कार्यालय, येवला, जि.नाशिक |
| ४३ | ४४ | JAGDALE SHUBHANGI BALNATH<br>जगदाळे शुभांगी बाळनाथ | OBC Female | OBC - Female - ४ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, दापोली, जि.रत्नागिरी |
| ४४ | ४५ | MARVE TRUPTI KRISHNANATH<br>मारवे तृप्ती क्रीष्णनाथ | NT-B Female | NT-B - Female - १ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, वाडा, जि.पालघर |
| ४५ | ४६ | SAYYAD AJAJ ABUBAKAR<br>सय्यद एजाज अबुबकर | EWS | EWS - General - २ | नाशिक | तहसिल कार्यालय, पाथर्डी, जि.अहिल्यानगर |

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C52100255E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:12:21 +05'30'

| अ.क्र. | मूळ गु.क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे कार्यालय / ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४६ | ४७ | INAMDAR SUMIT MAHESH<br>इनामदार सुमित महेश | EWS | EWS - General - ३ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, राजापूर,जि.रत्नागिरी |
| ४७ | ४८ | YELPALE SUMIT GANPAT<br>येलपले सुमित गणपत | EWS | EWS - General - ४ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| ४८ | ४९ | GAWALI SAGAR SOMNATH<br>गवळी सागर सोमनाथ | NT-B | NT-B - General - १ | नागपूर | तहसिल कार्यालय, सडक अर्जुनी, जि.गोंदिया |
| ४९ | ५० | SAYYAD ALIM YUSUF<br>सय्यद अलिम युसुफ | EWS | EWS - General - ५ | नागपूर | तहसिल कार्यालय, वर्धा, जि.वर्धा |
| ५० | ५१ | AWAGHADE HRUSHIKESH TANAJI<br>अवघडे ऋषिकेश तानाजी | SC | SC - General - १ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, लांजा, जि.रत्नागिरी |
| ५१ | ५२ | SHINDE MANOJ VIJAYKUMAR<br>शिंदे मनोज विजयकुमार | SC | SC - General - २ | छ.संभाजीनगर | तहसिल कार्यालय, देवणी, जि.लातूर |
| ५२ | ५३ | GHADAGE ABHIJEET GAUTAM<br>घाडगे अभिजीत गौतम | SC | SC - General - ३ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, खेड, जि.रत्नागिरी |
| ५३ | ५४ | Athwale Somesh Sudhakar<br>आठवले सोमेश सुधाकर | SC | SC - General - ४ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, गुहागर, जि.रत्नागिरी |
| ५४ | ५५ | SAWANT GAUTAM ANKUSH<br>सावंत गौतम अंकुश | SC | SC - General - ५ | कोकण -१ | तहसिल कार्यालय,देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| ५५ | ५७ | PARDESHI KOMAL BHARATSINGH<br>परदेशी कोमल भरतसिंह | DT-A Female | DT-A - Female - १ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, मंडणगड, जि.रत्नागिरी |
| ५६ | ५८ | Joshi Madhura Subhash<br>जोशी मधुरा सुभाष | EWS Female | EWS - Female - १ | छ.संभाजीनगर | विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, जि.संभाजीनगर |
| ५७ | ५९ | Rajput Snehal Swarupsingh<br>रजपूत स्नेहल स्वरूपसिंग | EWS Female | EWS - Female - २ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग |
| ५८ | ६० | SANDE RUKAIYYA MAHIBUB<br>संदे रूकैय्या महिबूब | EWS Female | EWS - Female - ३ | अमरावती | तहसिल कार्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती |
| ५९ | ६१ | KOLI SUREKHA DASHARATH<br>कोळी सुरेखा दशरथ | SBC Female | SBC - Female - १ | अमरावती | तहसिल कार्यालय, चिखलदरा जि.अमरावती |
| ६० | ६३ | DALVI SANDHYA SAMPAT<br>दळवी संध्या संपत | SC Female | SC - Female - २ | अमरावती | तहसिल कार्यालय, नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती |
| ६१ | ६४ | PAWAR USHA GANGADHAR<br>पवार उषा गंगाधर | SC Female | SC - Female - ३ | कोकण -१ | तहसिल कार्यालय, तलासरी, जि.पालघर |

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E95ED34CA51DB1F3C52100255SE05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:12:33 +05'30'

| अ.क्र. | मूळ गु.क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे कार्यालय / ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| ६२ | ६५ | BALLAL AISHWARYA NAMDEO<br>बल्लाळ ऐश्वर्या नामदेव | SEBC Female Group C (Locomotor & other disabilities) | Divyang – Locomotor disability - १ | पुणे | तहसिल कार्यालय, कागल, जि.कोल्हापूर |
| ६३ | ६६ | Hajare Prashant Vijaykumar<br>हजारे प्रशांत विजयकुमार | ST | ST - General - १ | अमरावती | तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा,जि.बुलढाणा |
| ६४ | ६७ | Bisen Isha Kirankumar<br>बिसेन ईशा किरणकुमार | OBC Female Group A (Visual Impairment) | Divyang – Visual impairment – १ | पुणे | तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर, जि.सोलापूर |
| ६५ | ६८ | DUDULE YADAO SHRIRANG<br>डुडुळे यादव श्रीरंग | ST | ST - General - २ | नागपूर | तहसिल कार्यालय, चार्मोशी, जि.गडचिरोली |
| ६६ | ६९ | Bagul Hemant Suresh<br>बागुल हेमंत सुरेश | ST | ST - General - ३ | अमरावती | तहसिल कार्यालय, धारणी, जि.अमरावती |
| ६७ | ७० | KELGANE SHIVANI SUDHIR<br>केळगणे शिवानी सुधीर | SBC Sports GR-B Female | OPEN – Sports GR-B - १ | कोकण-१ | तहसिल कार्यालय, जव्हार, जि.पालघर |
| ६८ | ७१ | KHADE SWATI RAJENDRA<br>खाडे स्वाती राजेंद्र | ST Female | ST - Female - १ | अमरावती | तहसिल कार्यालय, दिग्रस,जि.यवतमाळ |
| ६९ | ७२ | KHAMKAR AKSHADA RAJESH<br>खामकर अक्षदा राजेश | ST Female | ST - Female - २ | नागपूर | विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर,जि.नागपूर |
| ७० | ७३ | BUCHADE AAKANKSHA KISAN<br>बुचडे आकांक्षा किसन | OBC Sports GR-B Female | OBC – Sports GR-B – १ | अमरावती | तहसिल कार्यालय, पुसद, जि.यवतमाळ |
| ७१ | ७४ | YADAV DATTATRAY MARUTI<br>यादव दत्तात्रय मारूती | Unreserved Orphan – Type A & B | Orphan – Type A/B - १ | अमरावती | तहसिल कार्यालय, वणी, जि.यवतमाळ |
| ७२ | ७५ | WAYAL VISHAL RAJENDRA<br>वायाळ विशाल राजेंद्र | OBC Group B (Hearing Impairment) | Divyang – Hearing impairment – १ | पुणे | तहसिल कार्यालय, कडेगाव, जि.सांगली |
| ७३ | ७६ | PAWAR AKASH GAUTAM<br>पवार आकाश गौतम | SC Sports GR-B | SC – Sports GR-B – १ | नागपूर | तहसिल कार्यालय,गोरेगाव, जि.गोंदिया |

******

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D7D257E955ED34CA51DB1F3C5210025S5E0C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.09.24 18:12:52 +05'30'

**(प्रमोद पाटील)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**